# महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग

## जिल्हा परिषद, जळगाव अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिराती पदभरती सन २०१९

जाहिरात क्रमांक - ०२/२०२० दिनांक : २/१/२०२०

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगाव यांच्या आस्थापनेवरील गट क-संवर्गातील (शिक्षणसेवक) या पदांसाठी रिक्त पदे भरण्याकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र धारक यांची सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून पोस्टाने अर्ज मागविण्यात येत आहेत. पोस्टाने अथवा संबंधित कार्यालयात अर्ज सादर करावयाचे आहेत. याबाबत सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषदेच्या www.zpjalgaon.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**शिक्षणसेवक पद भरतीसाठी संवर्गनिहाय घोषित पदे**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव/पदाचे नाव | एकूण पद संख्या (अनु.जमाती) | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षणसेवक | ११६ | सर्वसाधारण-३२, महिला-३५, माजी सैनिक-१७, अंशकालीन-१२, प्रकल्पग्रस्त-०६, भूकंपग्रस्त-०२, खेळाडू-०६, दिव्यांग-०५, अनाथ-०१ |
| | **एकूण** | | **११६** |

पद भरती करिता सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना ही www.zpjalgaon.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. वरील पदासाठी समांतर आरक्षण निहाय पदांची माहिती शैक्षणिक अर्हता व किमान वयोमर्यादा, भरती प्रक्रिया शुल्क ऑफलाईन अर्ज करण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचना, निवड पद्धत, सर्वसाधारण अटी व शर्ती इत्यादीबाबत अधिक माहिती www.zpjalgaon.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज स्वीकारण्याची दि.०४/०१/२०२० ते दि.०६/०१/२०२० पावेतो सायं.५.४५ वाजेपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचे कार्यालयात सादर करावे. (अर्ज सादर करावयाचा कालावधी सकाळी १०.०० ते सायं.५.४५ पर्यंत शासकीय सुटीसह) भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ व घट करण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती जळगाव यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण- जळगाव
दिनांक २/१/२०२०

**सही/- सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती, तथा अति, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव**

**सही/- सदस्य तथा**
**जिल्हा निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव**

**सही/- अध्यक्ष तथा**
**जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, जळगाव**